# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.१७/०९/२०२०

## वाहनचोरी करणाऱ्या सराईतास अटक, १४ महागड्या मोटार सायकल हस्तगत, १२ गुन्हे उघडकीस पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची कारवाई

दि.११/०९/२०२० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे यांचे आदेशाने गुन्हे शाखा, युनिट १ कडील सहा.पोलीस निरीक्षक गणेश पाटील तसेच पोलीस कर्मचारी बाळु कोकाटे, अमित गायकवाड, नितीन खेसे, गणेश सावंत, विजय मोरे असे पोलीस पथक भोसरी पोलीस टाणे हद्दीत पाहीजे फरारी व रेकॉर्डवरील आरोपी चेक करीत असताना **पोलीस शिपाई गणेश सावंत** यांना माहिती मिळाली की, भोसरी येथुन के.टी.एम. मोटार सायकल चोरी केलेला चोर भोसरी येथील अंकुशराव लांडगे सभागृहाचे समोर येणार असुन त्याने अंगामध्ये काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट व पांढऱ्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट घातलेला आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळताच वपोनि उत्तम तांगडे यांचे मार्गदर्शनाखाली व सुचना प्रमाणे सपोनि गणेश पाटील यांनी पथकाच्या वेगवेगळ्या दोन टिम करून भोसरी येथील अंकुशराव लांडगे सभागृहाचे समोरील परीसरामध्ये सपाळा लावुन थांबले असताना बातमी मधिल नमुद वर्णनाचा एक इसम आंकुशराव लांडगे सभागृहाचे समोरील ब्रीजच्या खाली असलेल्या पार्कींग जवळ घुटमळत असताना दिसला तेव्हा सदर पोलीस पथक हे त्यास पकडणे कामी त्याचे जवळ जात असताना त्यास पोलीसांची चाहुल लागल्याने तो पळुन जावु लागला पथकातील कर्मचारी यांनी त्याचा पाठलाग करून मोठ्या सिताफीने त्यास पकडुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **हेमंत राजेंद्र भदाने, वय २४ वर्षे, भोरवाडा, घर क्रमांक ३, सातपुर, नाशिक** असे असल्याचे सांगितले. त्यास ताब्यात घेवुन गुन्हे शाखा, युनिट १ कार्यालय येथे आणुन त्याचेकडे तपास करता त्याने दि.१/०९/२०२० रोजी धावडेवस्ती, भोसरी येथुन के.टी.एम. मोटार सायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाले त्यानुसार भोसरी पोलीस स्टेशन येथे माहिती घेता त्याबाबत भोसरी पो.स्टे.गु.रजि.नं.४०६/२०२० भादवि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले. आरोपीबाबत अधिक माहिती घेता आरोपी हा नाशिक येथील सराईत वाहन चोर असल्याची माहिती प्राप्त झाली. त्याच्याकडे अधिक तपास केल्यास आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याने सपोनि गणेश पाटील यांनी सदर गुन्ह्याचा तपास स्वतःकडे घेवुन त्या गुन्ह्यामध्ये आरोपी यास अटक करून त्याची दि.१७/०९/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे.

आरोपीकडे तपास करता आरोपी याने पिंपरी चिंचवड व पुणे परीसरातुन बुलेट, एफ.झेड, के.टी.एम, पल्सर अशा महागड्या मोटार सायकली चोरी करून त्या बीड, अहमदनगर, धुळे या भागामधिल नागरीकांना कागदपत्रे नंतर देतो असे सांगुन विक्री केल्या असल्याचे उघड झाले. त्यानुसार सपोनि गणेश पाटील यांचे पथक सलग चार दिवस धुळे, बीड, नाशिक, औरंगाबाद व अहमदनगर या परीसरात थांबुन आरोपी याने विक्री केलेल्या व लपवुन ठेवलेल्या **१० बुलेट मोटार सायकली, २ एफ.झेड, १ के.टी.एम व १ पल्सर अशा एकुण १४ मोटार सयाकली कि.रू. १७ लाख ७० हजाराच्या** हस्तगत करण्यात आल्या आहेत. हस्तगत करण्यात आलेल्या मोटार सायकली बाबत अधिक तपास करता त्याबाब खालील प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे.

१) भोसरी ४०६/२०२० भादवि कलम ३७९ (के.टी.एम.)
२) चाकण ९४३/२०२० भादवि कलम ३७९ (बुलेट)
३) चाकण ९६९/२०२० भादवि कल ३७९ (बुलेट)
४) चाकण ८२०/२०२० भादवि कल ३७९ (बुलेट)

५) वाकड ५७३/२०२० भादवि कलम ३७९ (बुलेट)
६) एम.आय.डी.सी.भोसरी ४११/२०२० भादवि कलम ३७९ (पल्सर)
७) भारती विद्यापीठ, पुणे शहर ८४८/२०२० भादवि कलम ३७९ (बुलेट)
८) सहकारनगर पुणे शहर, १४३८/२०२० भादवि कलम ३७९ (बुलेट)
९) चतुःश्रृंगी, पुणे शहर ११६६/२०२० भादवि कलम ३७९ (बुलेट)
१०) हडपसर पुणे शहर ९४७/२०२० भादवि कलम ३७९ (बुलेट)
११)सरकारवाडा, नाशिक शहर ४०८/२०१५ भादवि कलम ३७९ (बुलेट)
१२) अंबड, नाशिक शहर ५०२/२०२० भादवि कलम ३७९ (एफ.झेड)

आरोपी याने चोरलेल्या मोटार सायकली विकत घेणारा व विक्री करण्यासाठी मदत करणारा त्याचा साथीदार **योगेश सुनिल भामरे, वय २४ वर्षे, रा.मु.गरताड, ता.जि.धुळे** यासही अटक करण्यात आली आहे.आरोपी हेमंत राजेंद्र भदाने हा मुळचा नाशिक येथील रहीवाशी असुन तो वाहन चोरी करणारा पोलीस रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वीचे **नाशिक जिल्ह्यात ३५ व ठाणे शहर येथे २ असे एकुण ३७ गुन्हे दाखल आहेत**. लॉकडाऊनच्या काळात आरोपी हा नाशिक वरून ट्रक, टेम्पो अशा मिळेल त्या वाहनाने पुण्यामध्ये येवुन **बुलेट, के.टी.एम.,एफ.झेड** किंवा **पल्सर** अशी कोणतीही **महागडी मोटार सायकल** चोरी करून ती मोटार सायकल बीड, धुळे, नाशिक या भागामध्ये घेवुन जावुन ग्राहकाला कागदपत्र नंतर देतो, फायनांन्सची गाडी आहे असे कारण सांगुन किंवा त्याचा वरील साथीदार योगेश सुनिल भामरे याचे मदतीने विक्री करीत असे. तसेच आरोपी हा फेसबुक व मेसेंजरच्या माध्यमातुन ग्राहक संपर्क साधुन गाडी विक्री करीत असे तसेच गाडी विक्री झाल्यावर दोघांमधिल संभाषण डिलीट करीत असे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्णप्रकाश, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त श्री.आर.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहा.पोली निरीक्षक गणेश पाटील, पोलीस उप निरीक्षक काळुराम लांडगे, तसेच पोलीस कर्मचारी पोलीस कर्मचारी प्रमोद लांडे, बाळु कोकाटे, अमित गायकवाड, नितीन खेसे, गणेश सावंत, विजय मोरे, प्रमोद गर्जे, मारूती जायभाये, विशाल भोईर, राजेंद्र शेटे, नागेश माळी यांचे पथकाने केली आहे.

